सायं.दैनिक
आवाज जनसामान्यांचा..
बीड
# किसान
• संपादक : शेख कामरान •

१२ वी सायन्स उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना बी. टेक (फूड टेक) तसेच बी.एस्सी. (ऑनर्स) ॲग्रीकल्चर पदवी घेवून सर्व क्षेत्रात हमखास १००% नोकरीची संधी.
आतापर्यंतच्या उत्तीर्ण सर्व बॅचेसचे १००% प्लेसमेंट
"अ" दर्जा प्राप्त सौ.के.एस.के. (काकू)
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी मान्यताप्राप्त
अन्नतंत्रज्ञान आणि कृषि महाविद्यालय
म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड - ४३१ १५३
कॉलेज ऑप्शन नंबर - बी. टेक. (फूड टेक.) - १६१७७ आणि बी.एस्सी (ऑनर्स) ॲग्री - ११२९३.
फॉर्म भरताना विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयाचा ऑप्शन एक नंबरला देणे
ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याचा अंतिम दि. १७ जुलै २०२५
प्रवेशासाठी संपर्क कार्यालय :- सागर हाईट्स, बस स्टॅंड समोर, बीड - ४३१ १२२
संपर्क क्र. :- ९४२००२५०५२ / ९७६३४३४५०४ / ९९७०८४२०१४ / ७५८८०८२०३४ / ९९४१००१२१२

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ७० ▪ बुधवार, दि. १६ जुलै, २०२५ ▪ पोस्टल दिनांक १७ जुलै, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-5 ▪ Issue-70 ▪ Wednesday 16 July, 2025 ▪ Postal Date 17 July, 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

# पंकजाताई तुमच्या केज तालुकाध्यक्ष भगवान केदारला शेतकऱ्यांचा गाळही पुरेना; २० लाखाचा गाळ गटकला!


## गाळ मुक्त तलाव अन् गाळ युक्त शिवारातून सत्ताधारी पक्षाचे पदाधिकारी मालामाल असे नामकरण करण्याची मागणी





**बीड । किसान न्युज**

तालुक्यातील जाधवजवळा येथे गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत २० लाख रुपयांचा निधी शेतकऱ्यांच्या शेतात गाळ न टाकता हडप केल्याचा प्रताप भाजपचे तालुकाध्यक्ष भगवान केदार यांनी केला आहे. हा प्रकार उघडकीस आल्याने शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त केला जात असून इतर गावातील शेतकरीही पुढे येण्याची शक्यता आहे. मात्र, कुणाच्या ध्यानी मनी नसलेल्या गाळ घोटाळ्यामुळे शेतकऱ्यांवर 'हे भगवान' म्हणण्याची वेळ आली आहे. शरद रमेश शिंदे आणि बाळासाहेब सकोराम उगले या शेतकऱ्यांनी हा आरोप केला असून, गावकऱ्यांना आणि ग्रामपंचायतीला कोणतीही माहिती न देता बनावट ठराव व डुप्लिकेट सह्या करून संपूर्ण निधी उचलल्याचा आरोप आहे. या प्रकरणात लघु पाटबंधारे विभागाचे अभियंता यांचाही सहभाग असून, यासंदर्भात तहसीलदारांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. मात्र, पंचनामा करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीतच भ्रष्टाचारात सहभागी असलेल्यांना » पान २ वर





### शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांना झापले!

अपर जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार, लघुपाटबंधारे अधिकारी, कर्मचारी यांच्या चौकशी समितीची स्थापना करण्यात आली आहे. यातच भ्रष्टाचाराचा आरोप आलेले अधिकारी दिसताच संतप्त शेतकऱ्यांनी त्यांना अडवून चांगलेच झापले. याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## नाहोली गावातही गाळ घोटाळा; गहिनीनाथ बिक्कड यांची तक्रार

केज तालुक्यातील नाहोली येथील गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेत भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप होत असून, या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेतकरी गहिनीनाथ बिक्कड यांनी कार्यकारी अभियंता, माजलगाव पाटबंधारे विभाग यांच्याकडे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, नाहोली येथील तलाव क्रमांक १ व २ अंतर्गत मंजूर कामांमध्ये बोगस बिलद्वारे पैसे उचलण्यात आले असून, प्रत्यक्षात गाळ शेतकऱ्यांच्या शेतात न टाकता निधीचा गैरवापर झाला आहे. त्यामुळे शासनाच्या योजनेचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेला नाही. लाभार्थी शेतकऱ्यांची संपूर्ण यादी, मोजमाप पुस्तिका (एम.बी.), प्रत्येक शेतकऱ्यावर झालेला खर्च व गाळ टाकल्याचा तपशील देण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच, पंचायत समिती, ग्रामपंचायत, कृषी व पाटबंधारे विभागातील नोंदींची पडताळणी करून अहवाल सादर करण्याची मागणी देखील केली आहे.

# वक्फ मालमत्तेवर भाडेकरार नसल्यास बुलडोझर कारवाई अटळ : ना.काझी

## १५ दिवसात भाडेकरार करून घेण्याचे केले आवाहन




**औरंगाबाद । किसान न्युज**

येथील सीएस नगर सध्या शहरात उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रास्ता रुंदीकरणासाठी युद्धस्तरावर कररवाई सुरू आहे. यात महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मालकीच्या मालमत्ताही येतात.अनेकांनी वक्फ बोर्डाशी भाडेकरार न करता अवैधरीत्या टोलेजंग इमारती उभ्या केल्या. या मालमत्तेवर ही बुलडोझर कारवाई होणार आहे. यामुळे वक्फ मालमत्ता धारकांना बोर्डाशी रीतसर भाडेकरार केला नाही त्यांनी पंधरा दिवसाच्या आत भाडेकरार करून घ्यावा,नसता बुलडोझर कररवाई अटळ आहे.असा इशारा मालमत्ताधारकांना बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी दिला आहे.

शहरात होत असलेल्या रस्ता रुंदीकरण प्रकरणी वक्फ मालमत्तांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.जालना रोड, हरसूल रोडवरील अनेक मालमत्ता या वक्फ मंडळाच्या अखत्यारीत येतात.अनेकांनी रीतसर भाडे करार न करता मालमत्तेवर घरे-दुकाने बांधली.यावर मनपा प्रशासक डी. श्रीकांत यांनी वक्फ मालमत्ता बाबत भूमिका मांडली. ज्या मालमत्ता वक्फ मंडळाच्या आहेत,त्या शासकीय नियमाच्या अधीन राहून कारवाई करण्यात येईल. » पान २ वर

## श्रींच्या पालकिचे आगमन



बीड :- आषाढी एकादशी नंतर पालख्यांच्या परतीचा प्रवास सुरू होतो. यानंतर बीडकरांना प्रतीक्षा असते ती गजानन महाराज पालखीची आजही पालखी कपीलधार येथे मुक्कामी असून उद्या गुरुवारी ही पालखी बीड शहरात दाखल होणार असून, यावर्षी ही पालखी खंडेश्वरी मंदीर परिसरात मुक्कामी राहणार असून तेथे जयत तयारी सुरू आहे.

# गेवराईत रोडरोमिओ शेफारलेत यांचे ढोपरं शेकायला पाहिजेत

## पीआय प्रविणकुमार बांगरांच्या डोळ्यात काय कुसळ गेल का म्हणून यांना काही दिसत नाही!





**गेवराई । किसान न्युज**

गेवराई शहरातील शाळा-महाविद्यालयांबाहेर व खाजगी क्लासेसच्या अवतीभवती रोडरोमिओनीं धुमाकूळ घातला असून, यातून अनेक विद्यार्थिनींची छेड काढण्याचे प्रकार वाढले आहेत. र.भ.अट्टल महाविद्यालय , न्युहास्कुल शाळा, जिल्हा परिषद मुलींची कन्या शाळा परिसरातील रोडरोमिओंचा मोठा त्रास असून, याबाबत पोलिसांनी कडक कारवाई करावी, अशी अपेक्षा पालक वर्गामधून व्यक्त केली जात आहे. विद्यार्थिनींबाबत » पान २ वर

### पालकांमध्ये नाराजी

रोडरोमिओंमुळे काही पालकांत शैक्षणिक दृष्ट्या भीतीचे वातावरण पसरले आहे बीड येथील झालेल्या खाजगी क्लासेसच्या घटनेमुळे खळबळ उडाली होती. शॉर्ट झालेले काही मातेफिरू तरुण विद्यार्थिनींना त्रासदायक ठरत आहेत नित्यनेमाने दररोज नवीन बस स्टॅन्ड ते शाळा महाविद्यालयापर्यंत सकाळी व शाळा सुटल्यानंतर या रोडरोमिओ शिट्ट्या मारत आहेत विद्यार्थिनींच्या अवतीभवती मोटार सायकल फिरून परत परत त्याच रस्त्याने चकरा मारत आहे मात्र, याकडे पोलिसांकडून कुठल्याही ठोस उपाययोजना न झाल्याने पालकांत नाराजी आहे. सदरील पोलीस प्रशासनाने दामिनी पथकाची स्थापना करून त्रास देणाऱ्यावर कारवाई करावी.

# बळीराजा मल्टीपल निधीवर गुन्हा दाखल करण्याचे कोर्टाचे आदेश



**गेवराई । किसान न्युज**

तालुक्यातील बळीराजा मल्टीपल निधी लि. गढी या संस्थेत ठेवलेली मुदत ठेव तीन लाख रुपये परत मिळत नसल्याने ठेवीदाराने न्यायालयात धाव घेतली असून याप्रकरणी कोर्टाने पैसे न देणाऱ्या या संस्थेवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे गेवराई तालुक्यातील संस्था चालकांवर आता विश्वास राहिला नाही अशी प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी ठेवीदाराच्या बाजूने ॲड. शरद काळे यांनी कोर्टात बाजू मांडली. ठेवीदाराच्या आत्महत्या नंतर छत्रपती मल्टीस्टेट आणि त्याचा फरार चेअरमन संतोष भंडारी हे राज्यात गाजत असताना आता गेवराई तालुक्यातून आणखीन एक मल्टीपल निधी संस्थेचा घोटाळा उघडकीस आला आहे. यामुळे गेवराई तालुक्यात या मल्टीस्टेट आणि मल्टीपल निधी मध्ये चाललंय तरी काय? असा प्रश्न उपस्थित » पान २ वर

# महादेव मुंडे हत्या प्रकरणी पत्नीचा आत्मदहनाचा प्रयत्न

## एसपींशी चर्चा; पण शेवटच्या क्षणाला काहीतरी प्राशन केल्याने वातावरण तापले





**बीड । किसान न्युज**

परळी येथील महादेव मुंडे हत्या प्रकरणी आज मुंडे कुटुंबाने आत्मदहनासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयात दाखल झाले होते. परंतु पोलिसांचा बंदोबस्त असल्याने त्यांनी हातातील पेट्रोलची बाटली हिसकावून घेतली यामुळे हा प्रयत्न फसला तसेच कुटुंबाशी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी चर्चा केली. यानंतर त्यांना तपासासाठी एक महिन्याचा वेळ देण्यात आला. परंतु शेवटच्या क्षणी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी काहीतरी प्राशन केले की, चक्कर आली हे समजले नसून त्यांना उपचारासाठी तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण यानंतर वातावरण तापले होते.

परळी येथील महादेव मुंडे यांचा जवळपास १८ महिन्यापूर्वी खून झाला आहे. परंतु याचा अद्याप तपास पूर्ण नसून आरोपीही निष्पन्न नाहीत. यामुळे पतीच्या मारेकऱ्यांना अटक करुन पतीला न्याय देण्यात यावा अशी मागणी करीत मयत महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे या सतत आंदोलन करीत आहेत. पण प्रत्येकवेळी त्यांना फक्त आश्वासन देण्यात येत असून त्यानंतर काहीच हालचाल दिसत नाही. यामुळे त्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात » पान २ वर

### माझ्या सिंदूरचे काय?

माध्यमांशी संवाद साधताना ज्ञानेश्वरी मुंडे यांनी भारत पाकिस्तानात घुसून हल्ला करुन दहशतवाद्यांचा खात्मा करुन सिंदूर ऑपरेशन राबवून ज्यांच सिंदूर हिरावल त्यांना न्याय देतो मग माझ्या सिंदूरच काय? माझेही सिंदूर हिरावून घेतले असून ते हिरावून घेणारे परळीतच रहातात मग त्यांच्यावर कारवाई करुन मला न्याय कधी देणार? माझ्या सिंदूरचे काय ? असा प्रश्न ज्ञानेश्वरी मुंडे यांनी प्रशासन आणि शासनाला विचारला आहे.

## अनिलदादांच्या नेतृत्वाखाली मुंबईत शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश!



**बीड । किसान न्युज**

हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन आणि महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथ शिंदे साहेब व संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, तालुकाप्रमुख वडवणी माऊली गोंडे, तालुकाप्रमुख धारूर नारायण कुरुंद यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातून रामदास भाई ढगे, संदिप माने, शिवाजी सावंत, महादेव मस्के, रमेश कुरकुटे, दत्ता सावंत, रमेश चौधरी, ज्ञानेश्वर मोरे, शिवाजी गोंडे, माऊली आगलावे. धारूर तालुक्यातून अनंत चिंचाळकर, शेख गफार शेख सत्तार, वशिष्ठ सातपुते , अनिल गांजले, सुनील कोमटवार, अमोल शिरसाट, दीपक चिद्रवार, विशाल भैरे यांच्या समावेत असंख्य कार्यकर्ते, पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी » पान २ वर

पाहिजेत
अनुभवी मॅनेजर व रूम बॉय नाईट साठी हॉटेल हिना लॉज जालना रोड बीड
Mob : 9325343615

हेल्थ कॅम्प
बीड शहर में पहली मर्तबा
हिंदुस्तान की मशहुर व मारुफ शख्सियत
डॉक्टर नुमान आलम साहब (दिल्ली)
Md.holistic Medicine (ex United Nations Consultant) Sector-4 Noida, India
माहिरे नब्ज (नाडी परीक्षण) आपके हर मर्ज व बीमारी सिर्फ आपकी नब्ज देख कर बताएंगे और उस हिसाब से इलाज करेंगे और दवाइयां देंगे

बतारीख 17 जुलाई 2025,
बरोज जुमेरात,सुबह 9 से रात 9 तक,
बमुकाम दारुल उलूम फंक्शन हॉल,
मोहल्ला बकर कसाब(चांदनी चौक),बीड
रजिस्ट्रेशन फीस 100/- रुपये रहेगी
केंसर,बी.पी.,शुगर,मोटापा,थायरॉईड,किडनी के मर्ज,औरतों की बिमारियां,बांझपन(औलाद न होना) एसिडिटी व पित,मर्दों की बिमारियां, ना मर्दी,बालों का झडना,त्वचा रोग,खुजली,लिकोरिया,पेट की बिमारियां, पथरी,बवासीर व फिशर,सर्दी व एलर्जी,जोडों का दर्द,वात और भी बहोत सारी बिमारियों का इलाज किया जायगा.
नीचे दिए गए नंबर पर अभी फोन कर के अपना नाम दर्ज कराएं
हाफिज अहसन 9011678252 / नोमान फारुकी 9405458920
मिन्जानिब: बीड मेडिकल हॉल,बलभीम चौक,बीड
DECENT: 91 75 566 266

स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट 98,600
२२ कॅरेट 95,500
चांदी प्रतिकिलो 112,000